- ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृतान्त व ६० वा वार्षिक अहवाल याच्या प्रती संस्थेच्या वेबसाईटवर (www.barc-ecs.com) व कार्यालयात दि. ३१ डिसेंबर २०२१ पासून उपलब्ध होतील.

- सभेच्या विषय पत्रिकेतील विषयास अनुसरून सभासदांना काही माहिती हवी असेल किंवा सूचना, प्रश्न सभेपुढे ठेवावयाचे असतील तर त्यांनी त्याबाबतची सूचना प्रत्यक्ष किंवा इ-मेलद्वारे लिखित स्वरुपात संस्थेत **दि.१० जानेवारी २०२२** सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत पाठवाव्यात.

- ज्या सभासदांनी सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षांचा लाभांश घेतला नसेल तर तो त्यांनी सोसायटीच्या कार्यालयीन वेळेत येऊन दि. ३१.०३.२०२२ पूर्वी घ्यावा. अन्यथा असा लाभांश वैधानिक गंगाजळी निधी खात्यात वर्ग करण्यात येईल.

- ज्या सभासदांनी ६०व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेसाठी दि.११.०१.२०२२ पर्यंत नोंदणी केली असेल त्याच सभासदांना कुपन देण्यात येईल.

**६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेत सहभागी होण्याकरिता दि.३१.१२.२०२१ ते ११.०१.२०२२ पर्यंत नोंदणी करण्याबाबत :**

- दि. ३१.१२.२०२१ ते ११.०१.२०२२ पर्यंत https://www.vcnowevents.in/60AGM-barc-eccs/ या लिंकद्वारे ऑनलाईन किंवा प्रत्यक्ष संस्थेत येऊन त्यासाठी असलेल्या विहित नमुन्यातील अर्ज भरून ऑफलाईन नोंदणी करता येईल.

- सभासदांना संस्थेच्या https://www.barc-ecs.com या वेबसाईटवर संगणक क्रमांकाच्या आधारे त्यांचा सभासद क्रमांक पहाता येईल.

**दि.१५.०१.२०२२ रोजी होणाऱ्या ६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेत सहभागी होण्यासाठी सूचना:**

- सभासदांना त्यांच्या मोबाइल नंबर / ईमेलवर ऑनलाईन सभेत सहभागी होण्याची लिंक मिळेल. सभासदांना त्या लिंकवर क्लिक करावे लागेल व लॉगिन करण्यासाठी त्यांचा सदस्यता क्रमांक प्रविष्ट करावा लागेल आणि वेबकास्टिंग / झूम App द्वारे ऑनलाईन सभेत सहभागी होता येईल.

- ज्या सभासदांनी रजिस्ट्रेशन केले आहे त्यांना सभेची लिंक https://www.vcnowevents.in/60AGM-barc-eccs/ ओपन करून सकाळी १०.४५ पासून सभा संपेपर्यंत सभेत सहभागी होता येईल व सकाळी ठीक ११.00 वाजता ऑनलाईन सभा सुरु होईल.

- ऑनलाइन वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभागी होण्यासाठी सभासदांकडे 4G किंवा Wi-Fi internet connectivity असणे आवश्यक आहे.

- ज्यावेळी मतदानाची आवश्यकता भासेल त्यावेळी WEBCASTING या पोर्टलवर जाऊन मतदान करता येईल, जे सभासद ZOOM या APP द्वारे सहभागी झाले असतील त्यांनी प्रथम ZOOM या APP मधून LOGOUT करावे व WEBCASTING मध्ये LOGIN करून त्यांना मतदान करता येईल.

- WEBCASTING लिंक द्वारे CONNECT केलेल्या सभासदास व्दिमार्ग संप्रेक्षणाद्वारे जोडण्यासाठी झूम मीटिंग लिंक देखील असेल. (यासाठी सदस्यांना त्यांच्या संगणकावर / मोबाइलवर झूम APP डाउनलोड आणि स्थापित करावा लागेल). सदस्यांना काही प्रश्न असल्यास त्यांना झूम पर्यायावर हात उंचवावा लागेल व सभेच्या अध्यक्षांच्या मान्यतेने, तो / ती UNMUTE होईल आणि मग तो / ती प्रश्न विचारू शकेल.

**६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेसाठी दि. ३१.१२.२०२१ ते ११.०१.२०२२ पर्यंत नोंदणी केलेल्या सभासदांना सभेचे कुपन मिळणे व वापरणे बाबत.**

- जे सभासद दि. ३१.१२.२०२१ ते ११.०१.२०२२ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात येऊन ऑफलाईन नोंदणी करतील त्यांना त्याच दिवशी सभेचे कुपन देण्यात येईल.

- जे सभासद ऑनलाईन नोंदणी करतील ते दि. ०३.०१.२०२२ ते १८.०१.२०२२ दरम्यान संस्थेच्या कार्यालयीन वेळेत येऊन स्वतःचे कुपन प्राप्त करू शकतील.

- ६० व्या वार्षिक सर्वसाधारण ऑनलाईन सभेसाठी देण्यात आलेल्या कुपनची वैधता दि. १५.०१.२०२२ ते २८.०१.२०२२ पर्यंत असेल व सदर कुपन आस्थापनेच्या Canteen/tea pantry मध्ये दिलेल्या मुदतीत वापरता येईल.

THE B.A.R.C. EMP. CO-OP. CR. ST. LTD. REGD. NO. 29770 OF 30-11-64